वृत्तपत्राचे नांव :— गांवकरी

वृत्तपत्र प्रकाशनाचे ठिकाण :— नाशिक

वृत्तपत्र पान क्र :— पुरवणी 2

दिनांक :—02/02/2010

प्रासंगिक

## स्वामी भारती कृष्णतीर्थ

# वैदिक गणिताचे प्रवर्तक

स्वामी भारती कृष्णतीर्थ यांचा जन्म तामिळनाडूमधील तिनेवेली (सध्याचे नाव तिरुनेलवेली) मार्च १८८४ मध्ये झाला. त्यांचे वडील कै. नरसिंह शास्त्री हे त्यावेळी तेथे तहसीलदार होते. स्वामी भारती कृष्णतीर्थ यांचे



मूळचे नाव वेंकटरमण शास्त्री. ते लहानपणापासूनच अत्यंत कुशाग्र बुध्दीचे होते. १८९९ मध्ये ते शालांत (मॅट्रीक) परीक्षा प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. त्याच वर्षी, त्यांचा संस्कृतवरील प्रभावाचा प्रत्यय येऊन मद्रास संस्कृत संघटनेने त्यांना 'सरस्वती' ही पदवी दिली.

इसवी सन १९०२ यावर्षी ते बी.ए. झाले. त्यावेळच्या एका 'न्यायविषयक अखिल भारतीय संमेलनात' सहभागी होण्याची संधी त्यांना मिळाली. तेथे त्यांचा गौरव होऊन ते 'रमण शास्त्री'चे 'रमण भारती' झाले. इसवी सन १९०४ मध्ये त्यांनी 'अमेरिकन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सेस'ची एम.ए.ची परीक्षा दिली. त्यावेळी त्यांनी एकाच वेळी विज्ञान, तत्त्वज्ञान, इतिहास, इंग्रजी, गणित व संस्कृत या सर्व विषयांमध्ये प्रथम क्रमांक मिळविला. त्यानंतर काही वर्ष ते बंगलोर येथे प्राध्यापक आणि प्राचार्य पदांवर कार्यरत होते. नंतर त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत कार्य केले. परंतु त्यांचा मूळचा पिंड योग्याचा त्यामुळे त्यांनी इसवी सन १९११ मध्ये शृंगेरी जवळच्या घनदाट अरण्यात एकांतवासात अध्यात्मसाधना सुरू केली. त्या अध्यात्मसाधनेच्या आठ वर्षांमध्येच त्यांनी 'वैदिक गणिताचा' अभ्यास केला.इसवी सन १९११ मध्ये त्यांना संन्यासदीक्षा दिली गेली आणि नाव ठेवले गेले भारती कृष्णतीर्थ. इसवी सन १९२५ मध्ये ते पुरीच्या गोवर्धनमठ पीठावर शंकराचार्य म्हणून आरुढ झाले. तसेच त्यांनी वैदिक गणिताच्या प्रचारासाठी भारतात व अमेरिकेत अनेक ठिकाणी व्याख्याने दिली.

संस्कृतवर त्यांचं जितकं प्रभुत्व होतं तितकच इंग्रजी, फ्रेंच, लॅटिनसह १०-१२ भारतीय भाष्यांवरही होतं. प्राचीन भारतीय संस्कृतीचा त्यांचा जितका सखोल अभ्यास होता तितकाच आधुनिक विज्ञानाचीही साधना केली.

'समत्वं योग उच्चते' ही व्याख्या ज्यांच्याबाबत सर्वार्थाने लागू पडते असा हा योगी, 'जगद्‌गुरु' ही उपाधी सार्थ ठरवून इसवी सन १९६० च्या २ फेब्रुवारीस महासमाधीस्थ झाला. श्रीमद् जगद्‌गुरु शंकराचार्य भारती कृष्णतीर्थ महाराज यांना विनम्र अभिवादन.

**तुझे तेज अंगी शतांशे जरीही ।**
**उजाळून देऊ दिशा दाही दाही ॥**

■ दिलीप गोटखिंडीकर